महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद-४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल : roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२१/ 438 दिनांक : 9 FEB 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमाद्वारे प्रसिध्दी करणे बाबत. ...**
संदर्भ : मा.संचालक,तंत्रशिक्षणसंचालनालय,महाराष्ट्रराज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/प्रवेश-२०२१-२२/६६ दिनांक २०.०१.२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण व मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार सर्व शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये १०० टक्के प्रवेश होण्याच्या दृष्टीने प्रत्येक प्राचार्यानी पुढाकार घेऊन,संस्थेतील अध्यापकांच्या सहाकार्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे.कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये एकंदरीतच शैक्षणिक वेळापत्रक पुढे गेलेले असले तरी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता पदविका प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणे अपेक्षित आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमाद्वारे प्रसिध्दी करणे बाबत सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्रानुसार प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने मुददा क्रमांक १ ते १६ नुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत : संदर्भीय पत्राची प्रत.

**(महेश शिवणकर)**
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/प्रवेश-२०२१-२२/ ६६ दिनांक : 20 JAN 2021

**ईमेलव्दारे**

प्रति,

१. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

२. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमाव्दारे प्रसिध्दी करणेबाबत...**

कोविड-१९ च्या कारणाने लागू झालेल्या लॉकडाऊनमुळे शिक्षण यंत्रणेसमोर उभ्या राहिलेल्या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाताना राज्याच्या तंत्रशिक्षण विभागातील अध्यापकांनी व संस्थांनी सकारात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ च्या प्रवेशासाठी स्कूल कनेक्ट उपक्रमाव्दारे पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ करण्यासाठी समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम इत्यादी कार्यक्रमांद्वारे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची प्रक्रिया डिसेंबर २०१९ मधेच सुरु झालेली होती. या सर्व गोष्टींचा एक सकारात्मक परिणाम शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या पदविका प्रवेश प्रक्रियेवर झालेला आहे. राज्यभरातील पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी यासाठी भरघोस प्रतिसाद दिलेला असून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण व मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार सर्व शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये १०० टक्के प्रवेश होण्याच्या दृष्टीने प्रत्येक प्राचार्यांनी पुढाकार घेऊन, संस्थेतील अध्यापकांच्या सहकार्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये एकंदरीतच शैक्षणिक वेळापत्रक पुढे गेलेले असले तरी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता पदविका प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणे अपेक्षित आहे.

सद्यस्थितीत राज्यात काही ठिकाणी ८वी ते १०वी चे वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत तर काही ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने शिकवणे सुरु झालेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमांव्दारे प्रसिध्दी करताना खालील मुद्यांचा समावेश करण्याबाबत सूचना आपल्या अखत्यारीतील शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी पदविका प्रवेशाकरीता संभाव्य विद्यार्थ्यांकरीता व त्यांच्या पालकाकरिता करीअर फेअर (Online / Offline) यांचे आयोजन करावे. त्यामध्ये मुख्यत्वे करुन अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी व पदविका अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर उपलब्ध असलेल्या संधी तसेच विविध माध्यमांव्दारे पदविका प्रवेशाबाबत जनजागृती करावी. १० चे विद्यार्थी कमी वयाचे असल्यामुळे त्यांच्या विचारावर पालकांच्या विचारांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे या वर्षीपासून सदर कार्यक्रमास विद्यार्थ्यांच्या पालकानासुद्धा निमंत्रित करावे. स्कूल कनेक्ट उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी, पालक यांच्यासाठी मेळावे आयोजित करावेत. या मेळाव्यास

उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकाविषयीची माहिती गोळा करावी. विद्यार्थी व पालकाना समजतील असे विषय करीअर फेयर कार्यक्रमात ठेवून त्याप्रकारे रचना करून कार्यक्रम आयोजित करावा व तशाच प्रकारे पार पाडावा.

२. स्कूल कनेक्ट उपक्रम शक्य असल्यास शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन अथवा Online पद्धतीने Cisco WebEx, Microsoft Teams, Google Meet, Zoom सारख्या विविध माध्यमांचा वापर करुन करून विद्यार्थी व पालकांसाठी राबविण्यात यावा.

३. सदर उपक्रम राबविताना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शाळेतील अधिकारी/ कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून करावयाच्या उपाययोजना, तसेच राज्य शासन व संबंधित जिल्ह्यात लागू असलेल्या सूचना, सुविधा (SOP) प्राचार्यांनी त्यांच्या चमूला द्याव्यात.

४. संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषेदेचे शिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक तसेच शाळेतील मोजके शिक्षक यांच्या एकत्रित सभा संबंधित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांमार्फत (Online/Offline) आयोजित करुन पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत जनजागृती करण्यात यावी. तंत्र शिक्षणातील विविध संधीची त्यांना कल्पना देऊन वेगाने होत असलेल्या बदलांचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य कसे उज्वल होईल हे विद्यार्थी व पालकांच्या तसेच जिल्हा परिषेदेचे शिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक तसेच शाळेतील शिक्षक यांच्या प्राकर्ष्याने नजरेस आणून द्यावे.

५. कोविड-१९ च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यामार्फत, परिसरातील शाळेच्या मुख्याध्यापकांची भेटीची वेळ निश्चित करणे, तंत्रनिकेतनांचे सादरीकरण (PPT) करणे, पत्रके वाटणे, शाळेतील मुलांची तंत्रनिकेतनांमध्ये भेट आयोजित करणे, शाळेतील मुलांना तंत्रनिकेतनांमधील लॅब, क्लासरूम, प्रोजेक्ट, विस्तृत परिसर, प्लेसमेंट दाखवणे, शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घडवणे, गावोगावी जाऊन करिअर फेअर आयोजन करणे.

६. विविध पदविका अभ्यासक्रम, पात्रता, प्रवेशनियमावली, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यांची थोडक्यात माहिती द्यावी.

७. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे कागदपत्रांच्या प्रत्यक्ष छाननी प्रक्रियेव्यतिरिक्त ई-स्क्रूटनीची संकल्पना कशा प्रकारे राबविण्यात आलेली होती, उमेदवार त्यांच्या सोयीनुसार छाननीची पद्धत / पर्याय कशा प्रकारे निवडू शकत होते, तसेच मोबाईलवरुन अर्ज कसा भरता येतो, याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

८. प्रवेश अर्ज भरणे, अर्ज निश्चिती करणे, गुणवत्ता यादी मधील त्रुटी दुरुस्त करणे, अंतिम गुणवत्ता यादी तपासणे, विकल्प सादर करणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, जागावाटप केलेल्या संस्थेत प्रत्यक्ष जाऊन प्रवेश घेणे इत्यादी पदविका प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत बाबींची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

९. शाळेमध्ये तंत्रनिकेतन व तंत्रनिकेतनातील विविध शाखांचे सादरीकरण, टीपीओ/विभागप्रमुख/शैक्षणिक प्रमुख यांचे भाषण, प्रसिद्ध माजी विद्यार्थी / उद्योजक यांची विद्यार्थ्यांशी अनौपचारिक चर्चा, अशा विविध उपक्रमांचे आयोजन करणे.

१०. कोविड-१९ मुळे शिक्षण पध्दतीमध्ये बदल झालेले आहेत, या कालावधीत प्राध्यापकांनी शिक्षण देणे व विद्यार्थ्यांनी शिक्षण घेणे ही प्रक्रिया काही प्रमाणात ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे. सदर प्रक्रिया संस्थेमार्फत कशा प्रकारे समर्थपणे पार पाडली जात आहे याबद्दल माहिती देणे.

११. तंत्र शिक्षण संस्थातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्योगात प्रशिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले जाते आणि त्यानुसार अदानी

थर्मल पावर स्टेशन, एल अँड टी, सिमन्स इंडिया लिमिटेड, मर्सिडीज बेन्ज, यामाहा, महिंद्रा यासारख्या उद्योगांचे प्रशिक्षण कार्यक्रम प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जात आहेत. यशदा पुणे आणि एन.आय.टी.टी.टी.आर. भोपाळ व पुणे येथील विस्तार केंद्र येथे प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येत आहेत. संचालनालयाने टाटा, रिलायन्स, महिंद्रा आणि महिंद्रा, लार्सन अँड टुब्रो, इन्स्टिट्यूट ऑफ एअरक्राफ्ट इंजिनीअरिंग या सारख्या नामवंत कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत जेणेकरून या माध्यमातून अभ्यासक्रम, अध्यापकांचे प्रशिक्षण, कौशल्य विकास / रोजगार या बाबत औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, इंटर्नशिप इत्यादी द्वारा अध्यापनाचा दर्जावाढ करण्यास मदत होत आहे.या बाबी विद्यार्थी व पालकांना समजावून सांगाव्यात.

१२. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात आली असून त्यासाठीच्या समितीवर औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी नियुक्त केले आहेत. सध्या औद्योगिक क्षेत्रांमधील आवश्यक गरजा आणि भविष्यातील संधींचा वेध घेऊन संस्थेमध्ये न्यू इमर्जिंग टेक्नॉलॉजी संबंधित अभ्यासक्रम व कौशल्य विकास वृद्धीसाठी अभ्यासक्रम सुरु केले गेले आहेत. 'Experiential Learning' या संकल्पनेचे महत्व लक्षात घेऊन राज्यात पदविका अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षापासून अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मायक्रो-प्रकल्प अनिवार्य केले आहे. अभ्यासक्रमात सुधारणा करताना उद्योगांच्या आवश्यकतांचे, त्यांच्याकडून प्राप्त सूचनांचे विश्लेषण केलेले आहे. पदविका अभ्यासक्रमांसाठी चौथ्या सत्रानंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी सहा आठवडयांचे औद्योगिक प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. तंत्र शिक्षण संस्थातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेमध्ये Incubation Center स्थापन केले गेले आहेत. या सर्व बाबींचा एकत्र परिणाम होऊन तंत्र शिक्षण पदविका अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. त्याचा परिपाक म्हणून पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांमध्ये प्रवेश वाढत आहेत व विद्यार्थ्यांना सहजपणे रोजगार उपलब्ध होत आहे. या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य उज्वल होईल व ते रोजगारक्षम, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे व उद्यमशील बनतील. या बाबी सुद्धा विद्यार्थी व पालकांच्या प्राकर्ष्याने नजरेस आणून द्याव्यात.

१३. स्कूल कनेक्ट उपक्रम राबविताना, शाळेतील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांबाबत तसेच त्यांच्या पालकासबंधित माहिती संकलित करुन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करण्यात यावी. ज्या ठिकाणी Online पद्धतीने स्कूल कनेक्ट उपक्रम राबविला जाणार असेल त्या ठिकाणी Google Form वा तत्सम पद्धतीचा वापर करुन माहिती संकलित करण्यात यावी. सदर माहिती सविस्तर डेटाबेसच्या स्वरुपात वेळोवेळी मंडळाच्या (MSBTE) संकेतस्थळावर अपडेट करण्यात यावी व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मोबाईल क्रमांकाचा सुध्दा त्यामध्ये समावेश करण्यात यावा. साधारणत; विद्यार्थी व पालकांविषयी तसेच संस्थेविषयीची माहिती सोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे गोळा करण्यात यावी.

१४. Online पद्धतीने स्कूल कनेक्ट उपक्रम राबविला जात असताना आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना Admission Process ची माहिती डिजीटल फॉरमॅट मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी.

१५. महाविद्यालयांमधील अध्यापकांनी/MSBTE ने पदविका अभ्यासक्रमांसाठी तयार केलेले E-content, तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध आधुनिक शिक्षण अध्यापनशास्त्रांचा (Teaching Pedagogy) या बद्दलची माहिती देण्यात यावी.

१६. शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या विषयी माहिती देऊन तंत्र शिक्षण कमी खर्चात तसेच कमी कालावधीत पूर्ण करून रोजगारक्षम तसेच उद्यमशील उद्योजक कसे बनता येईल यासंबंधी विस्तृत माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

सदर विद्यार्थ्यांच्या दहावीच्या परिक्षेनंतर व विद्यार्थ्यांचा दहावीचा निकाल लागल्यानंतर सुध्दा सदर प्रक्रीया सुरु ठेवण्यात यावी. शासकीय तंत्रनिकेतनांनी परिसरातील विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे समुपदेशन करावे. तंत्रनिकेतनातील अधिकारी / कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका वाटपाचे वेळी शाळेत उपस्थित राहून पदविका प्रवेशाबाबत मार्गदर्शन करावे, तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना पदविका प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे, प्रवेश सुविधा केंद्रांबाबत माहिती द्यावी व तंत्रशिक्षणासंबंधी नोकरी व्यवसायाच्या संधी याबाबत मार्गदर्शन सुध्दा करावे. याबाबत ही सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे. तसेच सदर कार्याचा आपल्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत: मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मुंबई-४०००३२, यांना माहितीसाठी सादर.

परिशिष्ट -अ

# School Connect Student Registration Information.

- School Connect Participating Student Information

a) Name of the Student.

b) Name of School.

c) Standard in which student studying.

d) District.

e) Taluka.

f) Mobile No. of Candidate.

g) Email Address.

h) SSC Seat No.

i) Names of Parent.

  i) Father.

  ii) Mother.

j) Occupation of Parent.

  i) Father.

  ii) Mother.

k) Mobile No. of Parent.

  i) Father.

  ii) Mother.

l) Email ID of Parents

  i) Father.

  ii) Mother.

# परिशिष्ट -ब

## School Connect School/ Organization Registration Information

- Organizing Institute Information

a) Organizing Institute Code.
b) Organizing Institute Name.
c) Type of School Connect.
d) MSBTE School Connect Approval Order No.
e) MSBTE School Connect Approval Date.
f) Amount Sanctioned by MSBTE.

- School Connect Information

a) Name of Participating School.
b) District.
c) Taluka.
d) Venue.
e) Date.
f) Local Publicity Medium.
g) Topic of Guidence.
h) Name-Post of Speaker.
   i) Speaker Name.
   ii) Speaker Post.
i) No. of Participants.
   i) Students.
   ii) Parents.
j) Name of Co-ordinator from School.
k) Contact No. of Co-ordinator from School.
l) Email of Co-ordinator from School..
m) Designation of Co-ordinator from School..
n) Name of School Principal.
o) Mobile no of Principal.